# श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शनि शिंगणापूर

**पोस्ट : सोनई, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) फोन: ०२४२७-२३८०९३**
**Email: shanishingnapur@yahoo.com / Web Site: www.shanidev.com**

## निविदा अर्ज

श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शनि शिंगणापूरच्या खालील कामाकरिता बंद पाकिटात निविदा मागविण्यात येत आहेत:

| अ.नं | निविदेचा तपशील |
|---|---|
| ०१ | **श्री शनि देवाच्या स्वयंभू मूर्तीला भाविकांनी अर्पण केलेले व प्रसादरूपाने जमा झालेले नारळ घेऊन जाणे** |

**नियम व अटी:**

1. **निविदा कालावधी:** सदर निविदेचा कालावधी दिनांक **३०.०४.२०२६ ते २९.०३.२०२७** असा एकूण ११ महिन्यांसाठी राहील.
2. **निविदा सादर करणे:** निविदाधारकाने दरपत्रकावर आपले संपूर्ण नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक स्पष्टपणे नमूद करावा. पाकिटावर **"प्रसाद रुपाने जमा झालेले नारळ घेवून जाणे बाबत निविदा"** असा उल्लेख करावा.
3. **दरपत्रक:** निविदाधारकाने संपूर्ण ११ महिन्यांच्या कालावधीसाठी **एकरकमी आगाऊ परवाना शुल्क (Lump sum License Fee)** नमूद करावे. ज्याचे दर उच्चतम (Highest) असतील, त्यांची निविदा मंजूर केली जाईल. परिशिष्ठ “क” मध्ये नमूद केल्या नुसार निविदा धारकाने स्वत: स्वाक्षरी केलेला दरा संबंधीचे प्रपत्र दरा संबंधीचा लिफाफा क्र.२ मध्ये सीलबंद करून सादर करावे.
4. **किमान रक्कम:** सदर कामासाठी किमान आधारभूत रक्कम **रु. ४२,५०,०००/- (रु. बेचाळीस लाख पन्नास हजार मात्र)** निश्चित करण्यात आली आहे. यापेक्षा कमी रकमेची निविदा स्वीकारली जाणार नाही.
5. **कागदपत्रे:** निविदेसोबत PAN कार्ड, आधार कार्ड/मतदान ओळखपत्र आणि ड्रायव्हिंग लायसन्स यांपैकी एकाची सत्यप्रत जोडणे बंधनकारक राहील.
6. **सुरक्षा अनामत (EMD):** निविदेसोबत रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) बयाणा रक्कम बँक डिमांड ड्राफ्टने 'Shri Shanishwar Devasthan' या नावाने किंवा संस्थानच्या बँक खात्यावर ऑनलाइन जमा करून त्याची पावती जोडणे अनिवार्य आहे.
7. **नारळ उचलणे:** रोजच्या रोज जमा झालेले नारळ तात्काळ उचलून मंदिर परिसराबाहेर घेऊन जाण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. मंदिर परिसरात नारळाचा साठा किंवा ढीग करता येणार नाही.
8. **वाहतूक व मजूर:** नारळ भरण्यासाठी लागणारी पोती, सुतळी, मजूर आणि वाहतूक व्यवस्था निविदाधारकाने स्वखर्चाने करावी लागेल. कामगारांसंबंधी बालकामगार प्रतिबंधक कायदा व इतर कामगार कायद्याचे पालन करणे बंधनकारक असेल. सदरील बाबीच्या उल्लंघना मुळे कोणतीही शासकीय कारवाई उद्भवल्यास त्याची जबाबदारी निविदाधारक यांची असेल .
9. **करारनामा:** निविदा मंजूर झाल्यापासून ७ दिवसांच्या आत शासनाने निश्चित केलेल्या नुसार करारनामा करून देणे बंधनकारक आहे.
10. **विद्युत बिल:** विजेचा वापर केल्यास मीटरप्रमाणे येणारे बिल निविदाधारकास भरावे लागेल.
11. **संस्थानचे नारळ:** संस्थानचे उत्सव (उदा. शनी जयंती, अमावास्या) आणि अतिमहत्वाच्या अतिथींसाठी लागणारे नारळ निविदाधारकाने संस्थानला मोफत उपलब्ध करून द्यावे लागतील.
12. **निविदा मुदत:** निविदा धारकांना निविदा अर्ज दि.२०.०४.२०२६ ते दि.२६.०४.२०२६ सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत देवस्थानचे लेखा विभागात कार्यालयीन वेळेत विकत घेता येतील. अथवा देवस्थानचे

संकेत स्थळ www.shanidev.com. येथून डाऊनलोड करता येतील. निविदा अर्जाची किंमत रू.१५००.०० (एक हजार पाचशे रूपये मात्र) जीएसटी सह विनापरतावा आहे.

13. **सीलबंद निविदा जमा:** दिनांक **२६.०४.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** संस्थानच्या संगणक विभागात जमा कराव्यात. देवस्थान कार्यालयात वर नमुद तारखेस व वेळेत जमा झालेल्या तांत्रिक लिफाफा दिनांक २७.०४.२०२६ रोजी सकाळी ठिक १०.०० वा. उघडण्यात येतील. त्याच दिवशी आर्थिक/दरा बाबतचा लिफाफा दुपारी ३.०० वा.उघडण्यात येईल मात्र तांत्रिक लिफाफा बाबत प्रश्न निर्माण झाल्यास आर्थिक/दरा बाबतचा लिफाफा उघडणे बाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. या दरम्यान निविदाधारक यांना उपस्थित राहता येईल.मात्र निविदा धारक उपस्थित नसल्यास त्यांचे अनुपस्थिती मध्ये निविदा उघडण्यात येतील व नंतर या बाबत कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.
14. **अधिकार:** कोणतीही निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवला आहे.
15. **शासनाचे नियम व कायद्याचे पालन**: नारळ निविदे बाबत शासनाचे नियम व कायद्याचे पालन करणे तसेच यासाठी शासनाकडे योग्य त्या प्रकारच्या करांचा भरणा करणे व इतर योग्य ती संपुर्ण पुर्तता करणे तसेच व्यवसायासंबंधी आवश्यक सरकारी परवाने घेणे हि सर्व जबाबदारी मंजूर निविदाधारक यांची राहिल. व्यवसाय करताना केंद्र/राज्य अथवा स्थानिक प्रशासन यांचेव्दारा निर्गमित करण्यात आलेले कायदे, नियम अथवा इतर कोणतेही निर्देश यांचे पालन करणे निविदाधारक यांना बंधनकारक असेल.
16. **भाविकांना नारळ प्रसाद देणे:** भाविकांनी मागणी केल्यास अर्धा नारळ फोडून भाविकास प्रसाद म्हणून देणे निविदा धारकावर बंधनकारक राहील.नारळ फोडण्यासाठी लागणारी मशिनरी व त्यासाठी लागणारा खर्च मंजूर निविदा धारकाने करावयाचा आहे.नारळ फोडण्याचे मशीन बंद आहे म्हणून नारळ फोडून दिला नाही अशी तक्रार भाविकाची आल्यास त्यात तथ्य आढळल्यास प्रत्येक तक्रारीस रु.५,०००/- दंड आकरण्यात येईल.
17. **नारळ फोडून प्रसाद देणे बाबत सूचना फलक** : भाविकांना नारळ प्रसाद देणे बाबत देवस्थान संस्थेने निश्चित केलेला सूचना फलक स्वखर्चाने नारळ जमा करण्याच्या ठिकाणी दर्शनी भागात लावणे निविदा धारकावर बंधनकार आहे.
18. **कालावधीच्या आत व्यवसाय सोडावयाचा असल्यास :** अकरा महीन्याचा कालावधी दिनांक ३०.०४.२०२६ ते दिनांक २९.०३.२०२७ असा राहील.या कालावधीच्या आत व्यवसाय सोडावयाचा असल्यास एक महीना अगोदर लेखी स्वरूपात अर्ज द्यावा लागेल.अशा प्रकारे मुदत पुर्व व्यवसाय सोडल्यास अगर देवस्थानने केलेल्या कारवाईमुळे व्यवसाय सोडावा लागल्यास सदर व्यवसायासाठी भरलेली परवाना शुल्क (११ महिन्यासाठी भरलेले शुल्क) व बयाणा रक्कम रक्कम जप्त केली जाईल या विषयी मंजूर निविदा धारक यांना कुठल्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही व अशा व्यवसाय धारकास काळ्या यादीत सामाविष्ठ करून पुढील निविदा प्रक्रीये मध्ये पुढील ३ वर्षा करिता भाग घेता येणार नाही.
19. **धार्मिक पावित्र्य आणि आचारसंहिता**: देवस्थानचे नारळ घेऊन जाणाऱ्या निविदाधारकाची आणि त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांची श्री शनिदेवावर पूर्ण श्रद्धा, भक्ती आणि आस्था असणे अनिवार्य आहे. श्री शनिदेव हे कोट्यवधी भक्तांचे श्रद्धास्थान असून त्यांचे धार्मिक महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे पूर्णतः पावित्र्य राखून आणि शनिदेवाचे मनोभावे स्मरण करूनच सेवा द्यावी. निविदाधारकाने दररोज शनिदेवाच्या प्रतिमेचे पूजन करणे तसेच भाविकांशी अत्यंत नम्रतेने व सौजन्याने वागणे बंधनकारक असेल. या सर्व अटींच्या पालनाबाबतचे प्रतिज्ञापत्र/प्रमाणपत्र पात्र निविदाधारकाने सादर करणे आवश्यक राहील.
20. **वाद:** या संदर्भात काही वाद निर्माण झाल्यास तो नेवासा/नगर न्यायालयाच्या कार्यकक्षेत राहील.

**स्थळ:** शनि शिंगणापूर

**दिनांक:** २० एप्रिल २०२६

अतुल चोरमारे<br>
कार्यकारी अधिकारी,<br>
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर.

## <u>परिशिष्ट " अ "</u>

## <u>निविदा धारकाबाबतची माहिती</u>

१------------------------------------------------------------------------------- संस्थेचे नाव/फर्मचे .

२--------------------------------------------------------------------पत्रव्यवरासाठी संपूर्ण पत्ता .

3. दूरध्वनी क्रमांक----------------------------------------------------------------

कार्यालय---------------------------------------------------

निवास--------------------------------------------------

फॅक्स नंबर-----------------------------------------------

ई----------------------------------------------------------मेल-

४ .संपर्क साठी व्यक्तीचे नाव----------------------------------------------------------------

दूरध्वनी क्रमांक ----------------------------------------------------------------------

५ १ भागीदारांची नावे/ मालकाचे .-----------------------------------------------------------

२-------------------------------------------------------------.

६ .RTGS Details

१------------------------------------------------------ बँक खाते नंबर .

२----------------------------------------------------------बँकेचे नाव .

3. शाखा ----------------------------------------------------------------

४-----------------------------------------------------आयएफसी कोड.

५--------------------------------------------- एम आय सी आर कोड .

**निविदा धारकाचे नाव व स्वाक्षरी**

**शिक्का**

**<u>परिशिष्ट “ ब “</u>**

**<u>तांत्रिक निविदेमधील कागदपत्रे (चेक लिस्ट )</u>**

| | |
|---|---|
| १) मतदान ओळखपत्र/ पॅनकार्ड/आधारकार्ड / ड्राईव्हींग लायसेन्स या पैकी एकाची झेरॉक्स | |
| २) पॅन कार्डची प्रमाणित प्रत. | |
| ३) कोणत्याही संस्था खाजगी संस्था / निमशासकीय / शासकीय / यांच्या काळ्या यादीमध्ये समाविष्ट नसल्याचे लेखी प्रतिज्ञापत्र. | |
| ४) श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था यांना निविदा (शिंगणापूर) धारकाने द्यावयाचे बंधपत्र | |
| ५) अद्यावत दुकान नोंदणी दाखला (शॉप ॲक्ट) / उद्यम आधार परवाना | |
| ६) शनिदेवावर पूर्ण श्रद्धा, भक्ती आणि आस्था असल्याचे हमीपत्र. | |

**निविदाधारकाचे नाव व स्वाक्षरी**

**शिक्का**

**परिशिष्ट “ क“**

दिनांक ३०.०४.२०२६ ते दिनांक २९.०३.२०२७ या कालावधी साठीची प्रसादरूपाने जमा झालेले नारळ अकरा महिन्याच्या कराराने विक्री करणेसाठी जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.नं. | व्यवसायाचा / कामाचा तपशील | अकरा महीन्याच्या कालावधी करिता एक रकमी परवाना शुल्क देवू इच्छितात ती रक्कम अंकी. |
|---|---|---|
| १ | श्री शनि देवाच्या स्वयंभू मुर्तीला भाविकांनी अर्पण केलेले व प्रसादरूपाने जमा झालेले नारळ विक्री करणे | रु. |

मंजुर निविदा धारकास त्यांनी परिशिष्ट “ क “ मध्ये नमुद केलेल्या परवाणा शुल्क रकमेवर सरकारी नियमानुसार होणारी अनुज्ञेय कराची रक्कम अतिरीक्त भरणा करावी लागेल.

निविदा धारकाचे नाव------------------------------------------------------------

सही --------------------------------------------

दिनांक - / /२०२६

**<u>परिशिष्ट “ ड “</u>**

**स्वयंघोषणा पत्र**

मी निविदाधारक --------------------------------------------------------------------------------स्वत: प्रमाणित करतो कि मी स्वत: साठी अगर निविदाधारकासाठी कुणीही, कोणत्याही स्वरूपाचा, कोणत्याही कारणास्तव संस्थानचे विरोधात दावा/अर्ज कोणत्याही न्यायालयात प्रलंबित नाही तसेच निविदा धारकाचे नाव संस्थांनचे काळ्या यादीत समावेश नाही. जरी संस्थान विरोधात दावा दाखल केलेला असल्यास सदर निविदाधारकांच्या निविदेचा विचार करण्यात येणार नाही याची मला पूर्ण जाणीव आहे.

निविदा धारकाचे नाव------------------------------------------------------------

सही --------------------------------------------

दिनांक -     /      /२०२६

**<u>परिशिष्ट “ इ“</u>**

**श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था द्यावयाचे बंधपत्र यांना निविदा धारकाने (शिंगणापूर)**

---

दिनांक :____

प्रति,
माकार्यकारी अधिकारी .,
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर),
ता नेवासा ., जि अहिल्यानगर .

विषय :श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्थ व्यवस्था (शिंगणापूर) ता.नेवासा, जि.अहिल्यानगर, यांच्या मालकीचे श्री शनि देवाच्या स्वयंभू मुर्तीला भाविकांनी अर्पण केलेले व प्रसादरूपाने जमा झालेले नारळ विक्री करणे या व्यवसायासाठी दिनांक ३०.०४.२०२६ ते दिनांक २९.०३.२०२७ या अकरा महीन्याच्या कालावधीसाठी परवाना पध्दतीने अकरा महिन्याच्या कराराने चालविण्यास देणे करिता निविदा बाबत.

महोदय,

मी देतो की / आम्ही खालीलप्रमाणे सही करून लिहून देतो /, वरील विषयासंबंधी आपण प्रसिद्ध केलेल्या निविदेतील सर्व अटी व शर्ती मी असून त् आम्ही वाचलेल्या /या मला / आपले अटी व शर्ती पालन करावयाचे मी .आम्हाला पूर्णतः मान्य आहेत / .आहोत/आम्ही मान्य करीत आहे

मी आम्ही आपणास निविदेत नमूद केले प्रमाणे /श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्थ व्यवस्था (शिंगणापूर) ता.नेवासा, जि.अहिल्यानगर यांच्या मालकीच्या श्री शनि देवाच्या स्वयंभू मुर्तीला भाविकांनी अर्पण केलेले व प्रसादरूपाने जमा झालेले नारळ विक्री करणे या व्यवसायासाठी दिनांक ३०.०४.२०२६ ते दिनांक २९.०३.२०२७ या अकरा महीन्याच्या कालावधीसाठी परवाना पध्दतीने अकरा महिन्याच्या कराराने चालविण्यास घेणे करिता हमी देतो तसेच सदर जागेचा वापर अनुज्ञेय नसलेले उद्योग व्यवसाय, सेवा तसेच कोणत्याही प्रकारचे अनैतिक,अधार्मिक अथवा देवस्थानच्या प्रतिमेला हाणी पोहचवणारा कोणताही व्यवसाय अथवा सेवा यासाठी करणार नाही. माझ्याकडे देवस्थानचा गाळा/जागा/व्यवसाय इ.ची थकबाकी स्वत:चे नावावर किंवा एकत्रित कुटूंबातील घटकाचे नावे नाही.

माझी आमची सादर केलेली/या व्यवसायासाठी ची निविदा मंजूर झाल्यास ७ दिवसाच्या आत शासनाने निश्चित केलेल्या नुसार करारनामा करून देऊ व परवाना शुल्क ११ महिन्याची एकूण रक्कम डी.डी. व्दारे संस्थांनकडे जमा करणे विषयांकित मंजूर निविदा दराने रक्कम भरणा करणे माझेवरआम्ही पात्र /आमच्यावर बंधनकारक राहील त्यात कसूर झाल्यास होणाऱ्या शिक्षेस मी / /राहू असे बंधपत्र देत आहेआहोत

आपला आपली विश्वासू /

फर्म मालकाचे नावे                                        सही व शिक्का .

(१) ---------------------------------------------------------

(२) ----------------------------------------------------------

**<u>परिशिष्ट “ ई “</u>**

**<u>शनिदेवावर पूर्ण श्रद्धा, भक्ती आणि आस्था असल्याचे हमीपत्र</u>**

**प्रति,**
**माकार्यकारी अधिकारी .,**
**श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर),**
**ता नेवासा ., जि अहिल्यानगर .**

मी, श्री/सौ/श्रीमती ____________________________________________________ (निविदाधारकाचे नाव), राहणार ________________, याद्वारे खालीलप्रमाणे लेखी हमी/प्रमाणपत्र देतो की:

१. माझी आणि माझ्याकडे काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची श्री शनिदेवावर पूर्ण श्रद्धा, भक्ती आणि आस्था आहे.

२. आम्ही श्री शनिदेवाचे धार्मिक महत्त्व आणि भक्तांच्या भावनांचा पूर्ण आदर राखू.

३. नारळ बाबत संपूर्ण पावित्र्य राखले जाईल आणि व्यावसायिक हेतू सोडून मनोभावे व सेवाभावी वृत्तीने कार्य केले जाईल.

४. नारळ जमा करण्याच्या ठिकाणी श्री शनिदेवाच्या प्रतिमेचे विधीवत पूजन केले जाईल.

५. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांशी मी स्वतः आणि माझे सर्व कर्मचारी अत्यंत नम्रतेने, सौजन्याने आणि आदराने वागतील याची मी पूर्ण जबाबदारी घेत आहे. भाविकांच्या तक्रारीस कोणताही वाव राहणार नाही, याची दक्षता घेतली जाईल.

६. देवस्थानने घालून दिलेल्या सर्व धार्मिक आणि प्रशासकीय नियमांचे मी काटेकोरपणे पालन करेन.

उपरोक्त माहिती आणि अटींचे उल्लंघन झाल्यास, माझा परवाना रद्द करण्याचा किंवा देवस्थान प्रशासनाकडून होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस मी पात्र राहीन, याची मला जाणीव आहे.

दिनांक: / /२०२
स्थळ:

निविदाधारकाची सही: ________

निविदाधारकाचे नाव: _________

मोबाईल क्रमांक: __________

(शिक्का)